# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 31/01/2023 (मंगळवार) सकाळ

## घरफोडी

**पो.स्टे. एमआयडीसी बुट्टीबोरी** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील टेंभरी येथे दिनांक २८/०१/२०२३ चे ११.०० वा. ते दिनांक ३०/०१/२०२३ चे १६.०० वा. दरम्यान प्राथमिक शाळा टेंभरी येथील किचन रूमचे लॉक तोडुन गॅस सिलेंन्डर किंमती अंदाजे २०००/— रू. चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— चंद्रकांत धोंडोबाजी दुर्गे, रा. वय ५४ वर्ष, रा. गुमगाव यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. १५५ संतोष तिवारी मो. नं. ९९२३२६१५५७ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १२ किमी अंतरावर ब्रम्हपुरी रिठी ढवळापुर शिवार येथे दिनांक २९/०१/२०२३ चे १०.०० वा. सुमारास यातील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी अंतर्गत येत असलेल्या शेत शिवारातील डि. पी वरील विदयुत उपकरणे ३०० मीटर कॉपर वायर किंमती अंदाजे १०५००/— रू. व ३ किटकॅट १०० केव्ही किंमती अंदाजे १६२०/— रू. असा एकुण १२१२०/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— निखिल जर्नादन भलमे, वय ३५ वर्ष, रा. पावर हाउस जवळ काटोल (कनिष्ठ अभियंता) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी काटोल यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूढे ब. नं. १६४६ पो.स्टे. काटोल मो. क्र. ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १२ किमी अंतरावर बोरी शिवार काटोल येथे दिनांक १९/०१/२०२३ ते २५/०१/२०२३ चे १८.०० वा. ते ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– शंकर पुंडलीक पाटील, वय ५३ वर्ष, रा. बोरी यांची शेती झिल्पा शिवारात असुन शेतीतील विहीरीवर ३ एच पी मोटार पंप बसविले असुन फिर्यादी हे दि. १९/०१/२०२३ रोजी शेतातील ओलीत करुन पंप बंद करुन घरी परत आले त्यानंतर दि. २५/०१/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वा. दरम्यान शेतातील कपासीला पाणी ओलण्यासाठी विहीरीतील मोटार सुरु करायला गेले असता विहीरीतील मोटार पंप दिसला नाही यावरुन आजुबाजुच्या लोकांना तसेच आजुबाजुच्या गावातील लोकांना मोटार पंपाचा शोध घेतला परंतु मिळुन न आल्याने टेक्सो कंपनीचा ए क्लास ३ एच पी मोटारपंप किंमती अंदाजे ५०००/–रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं ४५६ फिरोज शेख पो.स्टे. काटोल ७७२२०३६४५६हे करीत आहे.

**पोलीस माहिति कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**